# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१८८/११०

ईमेल: secretary@msbte.com संकेतस्थळ : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F१/२०२२/ ०५३ दिनांक — - 4 APR 2022

## महत्त्वाचे परीपत्रक

प्रति,

**प्राचार्य,**

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम तसेच औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था**

**विषय: उन्हाळी परीक्षा — २०२२ च्या आयोजनाबाबत...**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित सर्व अभ्यासक्रमाकरीता उन्हाळी परीक्षा — २०२२ ची रुपरेषा व कार्यपद्धती याबाबत मंडळाच्या विद्वत समितीच्या दि. २९/०३/२०२२ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन विद्वत समितीच्या शिफारशीने व मान्यतेने उन्हाळी — २०२२ परीक्षेबाबतच्या ठळक बाबी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम तसेच औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था, विद्यार्थी व त्यांच्या पालकांना माहिती व कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे-

१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त तसेच औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमातील सर्व सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांची उन्हाळी — २०२२ पासून **प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा** मंडळाच्या प्रचलित पद्धतीने लागू असलेल्या Teachning Examination Scheme, मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील तरतूद व Manual for conduct of Examination, Assessment Process & Post Result Activities मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार घेण्यात येणार आहेत.

२) विद्यार्थी हितास्तव केवळ उन्हाळी — २०२२ परीक्षेकरीता Teachning Examination Scheme नुसार निर्धारीत केलेल्या फक्त लेखी परीक्षेच्या कालावधीत प्रत्येक तासाच्या कालावधीकरीता अतिरीक्त १० मिनिटे वेळ देण्यात येईल. उदा. Teachning Examination Scheme नुसार लेखी परीक्षेसाठी ३ तासांचा कालावधी निर्धारीत केला असेल अशा लेखी परीक्षेस ३० मिनिटे अतिरीक्त वेळ देण्यात येईल.

३) मंडळाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील समसत्राकरीता शैक्षणिक वेळापत्रक दि. २१/०१/२०२२ रोजी जाहीर केले होते. त्यानुसार व्दितीय घटक चाचणी परीक्षा दिनांक २७.०५.२०२२ रोजी संपणार आहे. त्या अनुषंगाने उन्हाळी परीक्षा — २०२२ प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

| अनु. क्र. | परीक्षा | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक परीक्षा | २८ मे ते ६ जून, २०२२ |
| २ | लेखी परीक्षा | ८ जून ते २८ जून, २०२२ |

४) कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली अपवादात्मक परिस्थितीत प्रात्यक्षिक व Multiple Choice Question (MCQ) नुसार ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या आयोजनाकरीता मंडळाने निर्गमित केलेले परीपत्रक अथवा आदेश हे उन्हाळी परीक्षा – २०२२ पासून लागू राहणार नाहीत. सदर परीक्षेकरीता तसेच पुढील परीक्षेकरीता Examination Regulations (२०१८-२०१९) मधील सर्व तरतूदी तसेच Manual for conduct of Examination, Assessment Process & Post Result Activities नुसार देण्यात आलेली मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील.

संस्थेच्या प्राचार्यांनी सर्व सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा – २०२२ करीता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करून द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीस्तव –
मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता –
१) प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व स्वायत्त संस्था
२) उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद